# स्त्रियांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान : संदर्भ नाशिक जिल्हा

**सुभाष लक्ष्मण आहिरे**
सहयोगी प्राध्यापक,
म. स. गा. महाविद्यालय, मालेगांव कॅम्प.
मोबाईल नं. ८१४९५३४७३७
slahire68@gmail.com

माझा शोधनिबंधाचा विषय आहे राजकीय व सामाजिक चळवळीतील स्त्रियांचे विशेषत: नाशि जिल्ह्यातील स्त्रियांचे योगदान. मी हा विषय निवडला कारण त्या वेळेच्या सामाजिक परिस्थितीचा आढावा घे व स्त्रियांचे समाजातील स्थान याचा विचार करता केवळ ``चुल आणि मुल`` ऐवढेच सीमीत विश्व असले स्त्री जेव्हा उंबरठ्याबाहेर पाय ठेवते व राजकीय व सामाजिक चळवळीत सहभाग घेते ही गोष्ट त्यावेळी प्र प्रबोधनच होते. या प्रबोधनामागची पार्श्वभूमी, प्रेरणा, वैचारिक बदल, त्यातील स्त्रियांचे योगदान या गोष्टीं अभ्यास करणे हे क्रमप्राप्तच आहे. त्याचबरोबर त्यांच्या कार्याचा परिणाम अभ्यासणे हा विषय निवडण्यामाग खरा उद्देश आहे.

मध्ययुगीन रझिया सुलतान, राजामाता जिजाई, मुत्सद्दी ताराबाई, पेशवेकालीन आनंदीबाई, शुरसेना उमाबाई दाभाडे तर स्वातंत्र्यसंग्रामातील रणरागीणी झाशीची राणी अशा थोर स्त्री कर्तबगारीचा इतिह आपल्या भारतीय इतिहासाला लाभला आहे.

स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात स्त्रीची स्थिती कुटुंबात व कुटुंबाबाहेर दुय्यमच होती. जातीप्रथा पुरूषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाखाली स्त्री होती. त्यामुळे सुरवातीला स्त्रियांचा सहभाग मर्यादितच होता. म ब्रिटीशांच्या नव्या संस्कृतीचा एक वेगळा परिणाम व सुशिक्षित तरूणांच्या प्रयत्नाने स्त्री शिक्षण प्रवाह सुरू ाला. पुढे त्या राजकारण व समाजकारणात सहभागी होवू लागल्या. त्यामुळे आत्मनिर्भर होवून अन्याया विरोध करण्याची ताकद आली. यातून स्वातंत्र्य चळवळीत स्त्री सहभागाचा प्रवाह सुरू झाला.

स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या कामगिरीचा आवाका फार मोठा आहे. राणी लक्ष्मीबाई, प. रमाब ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, आनंदीबाई जोशी, हंसाबेन मेहता, सरोजिनी नायडू, प्रीतीलता वड्डेदार, दास, सुनिता चौधरी या सारख्या अनेक कर्तबगार स्त्रियांची मालिकाच आहे. परंतु मी विशेषत: नाशि जिल्ह्यातील स्त्रियांच्या चळवळीतील योगदानाविषयी शोधनिबंध सादर करीत आहे. कारण इतिहास अभ्यास नाशिकच्या इतिहास अभ्यासाला विशेष महत्व आले आहे.

स्वातंत्र्य चळवळीच्या संदर्भात राष्ट्रीय आंदोलनाचे दोन टप्पे नाशिकमध्ये आढळतात. पहिला ट इ.स. १८९५ ते १९०० पर्यंतचा व दुसरा टप्पा इ.स. १९०० ते १९४७ पर्यंतचा होता. इ.स. १९०० पर्यंत राजक हालचालीत स्त्रियांचा क्वचित सहभाग घेतलेली काही उदाहरणे आढळतात. त्यामध्ये बाबाराव सावरकरां पत्नी येसुबाई यांचे मोलाचे योगदान आहे. १ जानेवारी १९०० मध्ये वि.दा. सावरकरांनी नाशिकम ``मित्रमेळा`` (अभिनव भारत) ही गुप्त संघटना स्थापन केली. स्वातंत्र्य चळवळीसाठी समाजात जा घडवून आणणे हा या संघटनेचा हेतु होता. या संघटनेच्या कार्याची चर्चा सावरकरांच्या घरीच होत अ घरातील राजकीय वातावरणाचा येसुबाईंवर प्रभाव होता. १३ जून १९०८ रोजी सावरकरांच्या घरी झालेल्या ाडतीत काही आक्षेपार्ह वस्तु आढळल्या. परंतु त्यातील काही वस्तु येसुबाईंनी नष्ट केल्या. इ. स. १९०९ म बाबाराव सावरकरांना शिक्षा झाल्यावर त्यांनी समाजाच्या असहकारितेला व ब्रिटीशांच्या छळाला न घाब सौ. जानकीबाई गोरे, सौ. लक्ष्मीबाई भट, श्रीमती गोदुबाई खरे, सौ. लक्षुंबाई दातार व सौ. यमुनाबाई साव यांच्या सहकार्यातून ``आत्मनिष्ठ युवती संघ`` स्थापन केला. वर्तमान पत्रातील निवडक लेख वाचून जमलेल्या स्त्रियांना राजकारणाची माहिती देत असत.

इ.स. १८९८ च्या प्लेगच्या आपत्तीमुळे सावरकर बंधु व श्री. वामन दातार यांच्यात स्नेहबंध गेला. त्यामुळे वामनरावांची पत्नी सौ. लक्षुंबाई दातार यांचा सावरकर बंधु व येसुबाई यांच्या सहका